अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ ६२८४
दिनांक :- ११/१२/२०२०

## -: आदेश :-

विषय:- पुणे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील स्वच्छ भारत अभियानाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ:- १) आज्ञापत्र जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/४६९३, दि. ०६/१०/२०२०.
२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/ ८५० दि. ११/१२/२०२०

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्री. यशवंत डांगे, सहाय्यक आयुक्त यांचेकडे मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील सहाय्यक आयुक्त या पदाचे कामकाज सांभाळून सह महापालिका आयुक्त / उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचे नियंत्रणाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील स्वच्छ भारत अभियानाचे अतिरिक्त कामकाज संदर्भ क्र. १ च्या आज्ञापत्रान्वये सोपविण्यात आले आहे.

प्रशासकीय कामकाजाच्या सोईसाठी संदर्भ क्र. २ चे मान्यतेस अनुसरून श्री. यशवंत डांगे, सहाय्यक आयुक्त यांचेकडील मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील सहाय्यक आयुक्त या पदाचे कामकाज संपुष्टात आणून त्यांचेकडे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील स्वच्छ भारत अभियानासाठी नोडल अधिकारी म्हणून पूर्णवेळ कामकाज सोपविणेत येत आहे.

श्री. यशवंत डांगे, सहाय्यक आयुक्त यांनी सह महापालिका आयुक्त / उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचे नियंत्रणाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील स्वच्छ भारत अभियानाचे नोडल अधिकारी म्हणून पूर्णवेळ कामकाज करावयाचे आहे.

श्री. यशवंत डांगे, सहाय्यक आयुक्त यांनी वरीलप्रमाणे पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

श्री. यशवंत डांगे, सहाय्यक आयुक्त यांचे महिनेमहाचे वेतन व भत्ते मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने अदा करावयाचे आहे.

Rubal 11/12/2020
(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत : खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना . . .